उमरगा येथील सबजेल इमारतीमध्ये विद्युतीकरण-
करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
शासन निर्णय क्र. इआयजे-४६९२/१[१२४]/पीआरएस-२, दि. २८ एप्रिल, १९९३.

वाचा :- कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बीएलडी/
वायो/१९९२-९३/कक्ष-३, दिनांक १५.१०.१९९२

निर्णय :- अधीक्षक, उस्मानाबाद जिल्हा कारागृह यांच्या अधिपत्याखाली असलेले उमरगा सबजेल इमारतीमध्ये विद्युतीकरण करण्यासाठी येणारा अंदाजित खर्च रु.२३,१८६/- [रुपये तेवीस हजार, एकशे शहाऐंशी फक्त] इतक्या खर्चास शासन या आदेशाद्वारे प्रशासकीय मान्यता देत आहे.

२. यासाठी होणारा खर्च "२०५९ सार्वजनिक बांधकामे ०१ कार्यालयीन इमारती १०१ बांधकाम [illegible] - एकत्रित सर्वसाधारण कार्यालयीन जागेची व्यवस्था-तुरुंग[एक] स्वेच्छा अनुदानांमधून वित्त व्यवस्था केलेली गौण बांधकाम [योजनांतर्गत]" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन १९९३-९४ या वित्तीय वर्षातील मंजूर नियतव्ययातून भागविण्यात यावा.

३. हा आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, व वित्त विभागाच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारीक संदर्भ क्र. ५२७/अर्थ-२, दि.२४.११.९२, क्र. ३२७/योजना-१०, दि. ७.१.९३ व क्र. सीआर-१९/९३/व्यय-८, दि. १६.४.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[अ. ल. पाटील]
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
कारागृह उप महानिरीक्षक, [मुख्यालय] महाराष्ट्र राज्य, पुणे,
कारागृह उप महानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद,
अधीक्षक, उस्मानाबाद जिल्हा कारागृह, उस्मानाबाद,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा परिक्षा] मुंबई,

...२/-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारत-२, अर्थ-२,
नियोजन विभाग, योजना-१०,
वित्त विभाग, व्यय-८,
निवड नस्ती.

---x---